RNI No. MAHBIL /2009/37831

Reg. No. MH/MR/South-339/2011-13

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ३९(२)] गुरूवार, मे ३०, २०१३/ज्येष्ठ ९, शके १९३५ [पृष्ठ १२, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक ८३

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मे २०१३

### अधिसूचना

**महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८.**

क्रमांक.असंका २०११/प्र.क्र.२१४/कामगार ७ अ.—असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम, २००८(२००८ चा ३३)याच्या कलम ६ ची पोट-कलमे (४),(६) व(७) आणि कलम १० चे पोट-कलम (१) यांसह कलम १४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा तसेच याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहेत:-

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना, महाराष्ट्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा नियम, २०१३, असे म्हणावे.

(२) ते **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) ‘अधिनियम’ याचा अर्थ, असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम,२००८ (२००८ चा ३३), असा आहे;

(ख) ‘मंडळ’ याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ६ अन्वये गठीत केलेले, महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ, असा आहे;

(ग) ‘कार्याध्यक्ष’ याचा अर्थ, मंडळाचा कार्याध्यक्ष, असा आहे;

(घ) ‘सदस्य’ याचा अर्थ, मंडळाचा सदस्य, असा आहे;

(ङ) ‘कलम’ याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे.

(२) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

**३. सदस्यांचा पदावधी.**—(१) अधिनियमाच्या कलम (६) अन्वये गठित केलेल्या मंडळाचा पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्य त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीकरिता पद धारण करतील:



Scanned by CamScanner

परंतु, राज्य शासनास, कारणे लेखी नोंदवून आदेशाद्वारे, अशा कोणत्याही सदस्याचा किंवा सदस्यांचा कालावधी कमी करता येईल.

(२) कलम ६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) च्या उप-खंड(तीन) अन्वये नामनिर्देशित केलेला सदस्य, ज्या विधानसभेद्वारे तो अशाप्रकारे निवडून आला होता त्या विधानसभेचा सदस्य असण्याचे बंद झाल्यास , मंडळाचा सदस्य असल्याचे बंद होईल.

(३) कलम ६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ग) चे उप-खंड(एक), (दोन), (चार) व (पाच) अन्वये नामनिर्देशित केलेला सदस्य, ज्याप्रवर्गातून त्याचे नामनिर्देशन करण्यात आले होते, त्या हितसंबंधित प्रवर्गाचे प्रतिनिधीत्व करण्याचे बंद झाल्यास, मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल :

परंतु, उक्त कलम ६ च्या खंड (एक) अन्वये नामनिर्देशित केलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्पसंख्याक यांतील व्यक्तींना आणि महिलांना पुरेसे प्रतिनिधीत्व दिले जाईल.

(४) सदस्य त्याचे पुनःनामनिर्देशन केले जाण्यास पात्र असेल.

**४. राजीनामा.**—(१) जो मंडळाचा सदस्य पदसिद्ध नाही अशा मंडळाच्या सदस्यास, कार्याध्यक्षाला उद्देशून आपल्या पदाचा लेखी पत्राद्वारे राजीनामा देता येईल.

(२) अशा सदस्याची जागा ही, त्याचा राजीनामा स्वीकारण्यात आल्याचा दिनांक किंवा त्याच्या राजीनाम्याची सूचना मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीची समाप्ती, यापैकी जे अगोदर येईल तेव्हापासून रिक्त गणली जाईल.

(३) सदस्याचा राजीनामा स्वीकारण्याचा अधिकार कार्याध्यक्षाकडे निहित असेल व त्याने राजीनामा स्वीकारल्यावर तो मंडळाच्या पुढील बैठकीत मंडळाला त्याबाबत अहवाल देईल.

**५. पत्त्यातील बदल.**—सदस्य त्याच्या पत्त्यात बदल करीत असल्यास, तो मंडळाच्या सदस्य-सचिवाला त्याच्या नवीन पत्त्याची माहिती देईल. त्यानंतर सदस्य-सचिव कार्यालयीन अभिलेखामध्ये त्याच्या नवीन पत्त्याची नोंद करील :

परंतु, सदस्याने त्याच्या नवीन पत्त्याची माहिती देण्यात कसूर केल्यास सदस्याचा कार्यालयीन अभिलेखातील पत्ता, हा सर्व प्रयोजनांसाठी त्यांचा खरा पत्ता असल्याचे मानले जाईल.

**६. रिक्त पदे भरण्याची रीत.**—मंडळाच्या सदस्यत्त्वामध्ये एखादे पद रिक्त होत असेल किंवा होण्याचा संभव असेल तेव्हा, कार्याध्यक्ष, राज्य शासनाला अहवाल सादर करील आणि असा अहवाल मिळाल्यावर, राज्य शासनास, ते रिक्त पद भरण्याकरिता एखाद्या व्यक्तीस नामनिर्देशित करता येईल आणि अशा प्रकारे नामनिर्देशित केलेली व्यक्ती, ती ज्याच्या जागी नामनिर्देशित झालेली असेल त्या सदस्याच्या उर्वरित पदावधीकरिता ते पद धारण करील.

**७. सदस्यांचे भत्ते.**—(१) मंडळाच्या शासकीय सदस्याचा प्रवास भत्ता, त्याने कार्यालयीन कर्तव्यांसाठी केलेल्या प्रवासाकरिता त्याला लागू असतील अशा नियमांनुसार देय असेल आणि असा भत्ता, त्याला वेतन देणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून देण्यात येईल.

(२) मंडळाच्या अशासकीय सदस्यास, मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी, राज्य शासनाच्या गट 'अ' मधील अधिकाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या दरांनी प्रवास भत्ता देय असेल आणि त्यांच्या संबंधित ठिकाणच्या दैनिक भत्त्याची परिगणना, राज्य शासनाच्या गट 'अ' मधील अधिकाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या अधिकतम दराने करण्यात येईल.

**८. कामकाजाचा निपटारा करणे.**—मंडळाने विचारात घेणे आवश्यक असेल अशा प्रत्येक बाबींवर, मंडळाच्या बैठकीमध्ये किंवा कार्याध्यक्षाने तसे निदेश दिल्यास, प्रत्येक सदस्याकडे त्याच्या मतासाठी आवश्यक ती कागदपत्रे पाठवून विचार करण्यात येईल आणि त्या बाबीवर बहुमताने निर्णय होऊन त्यानुसार तिचा निपटारा केला जाईल:

परंतु, त्या बाबीवर बहुमत न होता, मंडळाच्या सदस्यांची मते समान विभागली गेली तर, कार्याध्यक्षाला दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

**स्पष्टीकरण.**—वरील परंतुकाच्या प्रयोजनार्थ 'कार्याध्यक्ष' या संज्ञेमध्ये, बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्याकरिता, नियम ९ च्या पोट - नियम (२) अन्वये नामनिर्देशन अथवा निवड केलेल्या सदस्यांचा समावेश होतो.

**९. बैठका.**—(१) कार्याध्यक्ष ठरवील अशा ठिकाणी व अशा वेळी मंडळाची बैठक होईल आणि तीन महिन्यांतून किमान एकदा अशी बैठक घेण्यात येईल.

(२) कार्याध्यक्ष हा मंडळाच्या प्रत्येक बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवील आणि त्याच्या अनुपस्थितीत, अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्यासाठी त्याला त्याच्या जागी मंडळाच्या एका सदस्यास नामनिर्देशित करता येईल आणि कार्याध्यक्षाने अशाप्रकारे नामनिर्देशित केलेला सदस्य अनुपस्थित राहिल्यास, त्या बैठकीस उपस्थित असलेल्या, मंडळाच्या सदस्यांना, अशा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविण्यासाठी त्यांच्यापैकी एका सदस्याची निवड करता येईल.

Scanned by CamScanner

**१०. बैठकीची नोटीस व कार्यसूची.**—(१) प्रस्तावित बैठकीकरिता मंडळाच्या सदस्यांना दोन आठवड्यांची नोटीस देण्यात येईल :

परंतु, कार्याध्यक्षास तसे करणे आवश्यक असल्याबाबत त्याची खात्री पटल्यास, अशा बैठकीकरिता एक महिन्यापेक्षा अधिक नसेल अशा दीर्घ कालावधीची नोटीस देता येईल.

(२) मंडळाच्या बैठकीकरिता असलेल्या, कार्यसूचीमध्ये अंतर्भूत असलेल्या कामकाजाखेरीज , अन्य कामकाजावर मंडळाच्या बैठकीमध्ये कार्याध्यक्षाच्या परवानगीशिवाय विचार केला जाणार नाही.

(३) कार्याध्यक्षास निकडीच्या प्रसंगी चर्चेचा विषय व निकडीची कारणे याबाबत केव्हाही विशेष बैठक बोलाविता येईल.

**११. गणपूर्ती.**—(१) मंडळाच्या कोणत्याही बैठकीत किमान सहा सदस्य, यात राज्य विधानमंडळाचा किमान एक सदस्याचा समावेश असेल, जर उपस्थित नसतील तर कोणतेही कामकाज चालविता येणार नाही:

परंतु, अशा कोणत्याही बैठकीत सहापेक्षा कमी सदस्य उपस्थित असतील तर, कार्याध्यक्षास उपस्थित सदस्यांना कळवून दुसऱ्या दिनांकापर्यंत ती बैठक तहकूब करता येईल व पूर्वी तहकूब केलेल्या अशा बैठकीमध्ये कामकाज निकाली काढण्याचा त्याचा विचार असल्याबाबत इतर सदस्यांना नोटीस देता येईल.

(२) राज्य शासनास, पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सदस्यास जर, -

(क) तो कार्याध्यक्षाला लेखी माहिती न देता आणि त्याची परवानगी न घेता, मंडळाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना स्वतः अनुपस्थित राहिला; किंवा

(ड) ज्या हितसंबंधाने त्याने मंडळावर प्रतिनिधित्व करणे अभिप्रेत आहे, त्या हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करण्याचे राज्य शासनाच्या मते त्याने बंद केले असेल, तर मंडळाच्या बैठकीत भाग घेण्यास मनाई करता येईल.

**१२. असंघटित कामगारांच्या नोंदणीसाठी अर्ज करण्याची रीत.**—अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम २ मध्ये निर्दिष्ट केलेला अर्ज,नमुना- एक मध्ये जिल्हा प्रशासनाकडे देण्यात येईल.

**१३. लाभार्थ्यांची नोंदणी.**—(१) प्रत्येक असंघटित कामगार,लाभार्थी म्हणून कलम १० च्या पोट- कलम २ अन्वये नोंदणीकरिता नमुना - एक मध्ये ग्रामीण क्षेत्रात जिल्हा पंचायतीच्या तर शहरी क्षेत्रात नागरी स्थानिक संस्थांच्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करील.

(२) राज्य शासनास जिल्हा पंचायत आणि नागरी स्थानिक संस्थांना, त्यांच्या एक वा याहून अधिक अधिकाऱ्यांना अधिनियमान्वये लाभार्थींची नोंदणी करणारे अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्याचे निदेश देता येईल.

(३) लाभार्थी म्हणून नोंदणीकरिता करण्यात येणाऱ्या प्रत्येक अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडण्यात येतील :—

(क) मंडळाने निश्चित केलेले शुल्क;

(ख) वयाचा दाखला;

(ग) लाभार्थी असंरक्षित कामगार असल्याबाबत त्याने किंवा तिने दिलेले प्रतिज्ञापत्र ;

(घ) पासपोर्ट आकारातील छायाचित्राच्या तीन प्रती;

(४) मंडळाचे सचिव नमुना-दोन मध्ये लाभार्थींची नोंदवही ठेवतील ;

(५) लाभार्थींना भरावयाचे नोंदणी शुल्क, मंडळाने आपल्या निर्णयाद्वारे वेळोवेळी ठरविल्याप्रमाणे असेल ;

(६) असंघटित कामगारांचे अंशदान मंडळाने आपल्या निर्णयाद्वारे ठरविल्याप्रमाणे असेल.

**१४. निधी व त्याचे उपयोजन व त्याबाबतची कार्यपद्धती**—

(१) मंडळाचा निधी—

(क) नियोक्ता, शासकीय, निम-शासकीय व खाजगी संघटना यांच्याकडून देणगी;

(ख) यामधून मिळालेल्या उत्पन्नासह विविध निधी-निर्माण योजनांमार्फत मिळालेले उत्पन्न;

Scanned by CamScanner

(२) मंडळाचा स्वतःचा निधी असेल व ते त्याची व्यवस्था ठेवील आणि त्यामध्ये पुढील रक्कमा जमा करण्यात येतील :-

(क) राज्य शासनाकडून मंडळाला मिळालेला सर्व रक्कमा;

(ख) मालमत्ता आणि इतर मत्ता यांची विक्री व विल्हेवाट याद्वारे मंडळाला मिळालेला सर्व पैसा;

(ग) रोखे व ठेवी यांमधील गुंतवणुकीवरील व्याज, भाडे आणि इतर कोणत्याही रीतीने किंवा इतर कोणत्याही साधनातून मंडळाला मिळालेला सर्व पैसा;

(३) (१) प्रत्येक मंडळ, असंघटित कामगारांस विविध लाभ देणारा निधी स्थापन करील आणि त्यामध्ये जमा करण्याबाबतची एक कार्यपद्धती असेल,

(क) केंद्र व राज्य शासनाकडून दरवर्षी मिळालेली अनुदाने ;

(ख) असंघटित कामगारांनी दिलेली सर्व अंशदाने;

(ग) अन्य कोणत्याही साधनाद्वारे मंडळाला मिळालेल्या इतर सर्व रक्कमा.

(२) पुढील खर्च भागविण्याकरिता निधीचे उपयोजन करण्यात येईल :-

(क) कलम ६ अन्वये आपली कार्ये पार पाडताना मंडळाने केलेला खर्च;

(ख) मंडळाचे सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन , भत्ते व इतर पारिश्रमिक, आणि

(ग) राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अन्य विषयांवरील व प्रयोजनांवरील खर्च.

(३) मंडळाला एक वा त्याहून अधिक राष्ट्रीयीकृत बँकामध्ये चालू व ठेव खाते उघडता येईल आणि विनियमांमध्ये नमूद करण्यात येईल अशा, मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून ते चालविण्यात येईल.

(४) कोणत्याही नोंदणीकृत असंघटित कामगार अधिनियामन्वये तो ज्या लाभांकरिता पात्र आहे त्या लाभांकरिता, निधीतून प्रदाने देण्यात यावीत यासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशी कागदपत्रे सोबत जोडून मंडळाकडे अर्ज करता येईल.

(५) असा प्रत्येक अर्ज मिळाल्यावर, मंडळास, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करता येईल आणि एकतर अर्ज मंजूर करता येईल अथवा, त्याबाबतची कारणे लेखी नोंदवून तो अर्ज फेटाळता येईल :

परंतु, अर्जदारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही.

(६) याबावतीत मंडळाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

**१५. योजना**—राज्य शासनास, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एक वा त्याहून अधिक क्षेत्रांमध्ये, असंघटित कामगारांच्या कोणत्याही गटाकरिता एक वा त्याहून अधिक योजना, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तयार करता येतील.

**१६.अभिलेख**—मंडळास कायदेशीर अभिलेख व नोंदवह्या ठेवण्याकरिता, मंडळाच्या एक वा त्याहून अधिक अधिकाऱ्यांना प्राधिकृत करता येईल.

**१७. लेखे व लेखापरीक्षा**–

(१) मंडळ योग्य लेखे व इतर संबद्ध अभिलेख ठेवील आणि ताळेबंदासह, लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) मंडळाच्या लेख्यांची लेखापरिक्षा, राज्य शासन नियुक्त करील अशा अर्हताप्राप्त व्यक्ती कडून दरवर्षी करण्यात येईल.

(३) लेखापरीक्षकास सर्व योग्य वेळी, मंडळाची लेखापुस्तके व इतर दस्ताऐवज पाहता येईल, आणि लेखापरीक्षेच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक वाटेल असे स्पष्टीकरण व माहिती मागविता येईल अथवा मंडळाच्या कोणत्याही सदस्याची वा अधिकाऱ्याची तपासणी करता येईल.

(४) लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले लेखे, तसेच त्यावरील लेखापरीक्षित अहवाल, राज्य शासन त्याबाबत विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापूर्वी, दरवर्षी राज्य शासनाकडे पाठविण्यात येतील.

(५) राज्य शासनाने लेखापरीक्षकाच्या अहवालाचे अवलोकन केल्यानंतर राज्य शासन देईल अशा निदेशांचे मंडळाकडून पालन केले जाईल.

(६) राज्य शासनाने निर्धारीत केल्याप्रमाणे लेखापरीक्षेचा खर्च, मंडळाच्या अर्थसंकल्पातून देण्यात येईल.

Scanned by CamScanner

## नमुना - एक

(नियम -१२)

(असंघटित कामगारांच्या नोंदणीकरिताचा अर्ज)

१. असंघटित कामगाराचे नाव :

२. वडिलांचे/पतीचे नाव :

३. व्यवसाय :

४. पत्ता (क) सध्याचा

(ख) कायमचा :

५. दूरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक :

६. राष्ट्रीय सुरक्षा योजनेचा कार्डधारक आहे किंवा कसे, असल्यास, क्रमांक :

७. अवलंबित व्यक्ती :

(क) वडील :

(ख) आई :

(ग) पती/पत्नी :

(घ) अवलंबित मुले :

(ङ) इतर :

८. सोबत जोडलेली कागदपत्रे :

अर्जदाराची स्वाक्षरी / अंगठयाचा ठसा

ठिकाण :

दिनांक :

Scanned by CamScanner

नमुना - दोन

[नियम १३ (४)]

१. संपूर्ण नाव :

२. कायमचा पत्ता :

३. जन्मतारीख :

४. लिंग स्त्री /पुरुष :

५. नोंदणी क्रमांक :

६. नामनिर्देशित व्यक्तीचे नाव, नाते व पत्ता :

७. वेद्यकीय दाखला घेतला आहे किंवा कसे :

८. सेवाविषयक तपशील :

| सध्याचा पत्ता | कामाचे स्वरुप व पदनाम | विद्यमान नियोक्त्याचे नाव,पत्ता व दूरध्वनी क्रमांक | सेवा प्रवेशाचा दिनांक | मंडळाच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बाळासाहेब कोळसे,**
शासनाचे सह सचिव (कामगार).

Scanned by CamScanner

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. Asanka 2011/C.R. 214/Lab-7 A, dated the 30th May 2013 is hereby published under the authority of the Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BALASAHEB KOLASE,
Joint Secretary to Government.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032
dated the 30th May 2013

*NOTIFICATION*

MAHARASHTRA UNORGANISED WORKERS SOCIAL SECURITY RULES, 2013.

No. Asanka 2011/C.R. 214/Lab-7a.— In exercise of the powers conferred by section 14 read with sub-sections *(4)*, *(6)* and *(7)* of section 6 and sub-section *(1)* of section 10 of the Unorganised Workers' Social Security Act, 2008 (33 of 2008), and of all other powers enabling it in that behalf, the State Government hereby makes the following rules, namely :—

**1. Short title and commencement.**—(1) These rules may be called the Maharashtra Unorganised Workers' Social Security Rules, 2013.

(2) They shall come into force on the date of their publication in the *Official Gazette*.

**2. Definitions.**—(1) In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means the Unorganized Workers' Social Security Act, 2008 (33 of 2008);

(*b*) "Board" means the Maharashtra State Social Security Board constituted under section 6 of the Act;

(*c*) "Chairperson" means the Chairperson of the Board;

(*d*) "member" means a member of the Board;

(*e*) "section" means a section of the Act.

(2) Words and expressions used and not defined in these rules but defined in the Act shall have the meanings respectively assigned to them in the Act.

**3. Term of office of members.**—(1) The term of office of the members of the Board constituted under section 6 of the Act, other than an *ex-officio* member, shall hold office for a period not exceeding three years from the date of their nominations :

Provided that, the State Government may by order curtail the term of office of any such member or members for reasons to be recorded in writing.

(2) A member nominated under sub-clause (iii) of clause (c) of sub-section (3) of section 6 shall cease to be a member of the Board if he ceases to be a member of Legislative Assembly by which he was so elected.

(3) A member nominated under sub-clauses (i), (ii), (iv) and (v) of clause (c) of sub-section (2) of section 6 shall cease to be a member of the Board if he ceases to represent the category of interest from which he was so nominated :

Provided that, out of the persons nominated under clause (i) of said section 6 adequate representation shall be given to persons belonging to the Scheduled Caste, the Scheduled Tribe, the Minorities and Women.

(4) A member shall be eligible for re-nomination.

भाग चार-ब-८३-२अ

Scanned by CamScanner

**4. Resignation.**—(1) A member of the Board, not being an *ex-officio* member, may resign his office by a letter in writing addressed to the Chairperson.

(2) The seat of such a member shall fall vacant from the date on which his resignation is accepted or on the expiry of thirty days from the date of receipt of intimation of resignation, whichever is earlier.

(3) The power to accept the resignation of a member shall vest in the Chairperson who, on accepting the resignation, shall report to the Board at its next meeting.

**5. Change of Address.**—If a member changes his address, he shall notify his new address to the Member Secretary of the Board who shall thereupon enter his new address in the official records :

Provided that, if a member fails to notify his new address, the address in the official records shall for all purposes be deemed to be the member's correct address.

**6. Manner of filling vacancies.**—When a vacancy occurs or is likely to occur in the membership of the Board the Chairperson shall submit a report to the State Government and on receipt of such report, the State Government may, nominate a person to fill the vacancy and the person so nominated shall hold office for the remainder of the term of office of the member in whose place he is nominated.

**7. Allowances to members.**—(1) The travelling allowance of an official member of the Board shall be governed by the rules applicable to him for journey performed by him on official duties and shall be paid by the authority paying his salary.

(2) The non-official members of the Board shall be paid travelling allowance for attending the meetings of the Board at such rates as are admissible to a Group 'A' Officer of the State Government and daily allowances shall be calculated at the maximum rate admissible to Group 'A' Officers of the State Government in their respective places.

**8. Disposal of business.**—Every matter which the Board is required to take into consideration shall be considered at a meeting of the Board, or if the Chairperson so directs, by sending the necessary papers to every member for opinion, and the matter shall be disposed of in accordance with the decision of the majority :

Provided that, where there is no opinion of majority on a matter and the members of the Board are equally divided, the Chairperson shall have a second or a casting vote.

**Explanation**—The expression "Chairperson" for the purpose of the above proviso shall include a member nominated or chosen under sub-rule (2) of rule 9 to preside over a meeting.

**9. Meetings**—.(1) The Board shall meet at such places and at such times as may be decided by the Chairperson and it shall meet at least once in three months.

(2) The Chairperson shall preside over every meeting of the Board in which he is present and in his absence he may nominate a member of the Board to preside over such a meeting in his place and in the absence of such nomination by the Chairperson, the members of the Board present in such meeting may choose from amongst themselves a member to preside over the meeting.

**10. Notice of meetings and list of business.**—(1) Ordinarily, two weeks notice shall be given to the members of the Board of a proposed meeting :

Provided that, the Chairperson, if he is satisfied that it is expedient so to do, may give notice of longer period not exceeding one month for such meeting.

(2) No business except which is included in the list of business for a meeting of the Board shall be considered at the meeting of the Board shall be considered at the meeting without the permission of the Chairperson.

(3) The Chairperson may at any time call a special meeting of the Board in case of urgency, after informing the members in advance about the subject matter of discussion and the reasons of urgency.

**11. Quorum.**—(1) No business shall be transacted at any meeting of the Board unless at least six members are present in that meeting which shall include at least one Member of Legislative Assembly :

Provided that, if at a meeting, less than six members are present, the Chairperson may adjourn the meeting to another date informing the members present and giving notice to the other members that he proposes to dispose of the business at the adjourned meeting whether there is prescribed quorum or not, and it shall thereupon be lawful for him to dispose of the business at the adjourned meeting irrespective of the number of members attending.

(2) The State Government may debar any member, other than *ex-officio* members, from taking part in the Meeting of the Board if.—

(a) he absents himself from three consecutive meetings of the Board without written information to and consent of the Chairperson, or

(b) in the view of the State Government, such member has ceased to represent the interest which he purports to represent on the Board.

**12. Manner of making application for registration of unorganized worker.**—(1) The application referred to in sub-section (2) of section 10 of the Act shall be made in Form I, to the District Administration.

**13. Registration of Beneficiary.**—(1) Every unorganized worker shall apply in Form I for registration under sub-section (2) of section 10 as a beneficiary, to the authorized officer of the District Panchayat in rural areas and the Urban Local Bodies in urban areas respectively.

(2) The State Government may direct to the District Panchayat and Urban Local Bodies shall authorize one or more of its officers to be the registering officer of beneficiaries under the Act.

(3) The application for registration as beneficiary shall be accompanied with the following :—

(*a*) A fee may be as fixed by the Board.

(*b*) Proof of age.

(*c*) Self declaration by him or her confirming that he or she is an unorganized worker.

(*d*) 3 copies of passport size photograph.

(4) The Secretary of Board shall maintain register of beneficiaries in Form II.

(5) Registration fee of the beneficiary shall be, as decided by the Board *vide* its resolution, from time to time.

(6) Contribution from the unorganized worker shall be, as decided by the Board *vide* its resolution, from time to time.

**14. Funds, its application and procedure thereof.**—

(1) Funds of Board,—

(*a*) Donation by employers, Governments, Semi-Government and private organization;

(*b*) Income obtain through various fund generating schemes, including income from the

(2) The board shall have and maintain its own Fund to which shall be credited,—

(*a*) All money received by the Board from the State Government;

(*b*) All money received by the Board by way of sale and disposal of property and other assets;

(c) Interest on investment in security and deposits, rent and all money received by the Board in any other manner or from any other sources.

Scanned by CamScanner

(3) (1) There shall be constituted by every Board a fund providing various benefits to the unorganized worker and there shall be procedure credited thereto.

(*a*) Grants received from the Central and State Government every year.

(*b*) All contributions made by the unorganized workers.

(*c*) All other sums received by the Board from any other source.

(2) The fund shall be applied for meeting following,

(a) Expenses of the board in the discharge of its functions under Section 6.

(b) Salaries, allowances and other remuneration of the members, officers and other employees of the Board, and

(c) Expenses on other objects and for the purposes authorized by the State Government.

(3) The Board may keep current and deposit account with one or more nationalised bank and the same may be operated by such officers of the Board as may be laid down in the regulations.

(4) Any unorganized worker registered may make an application to the Board in such form and accompanied by such documents as may be prescribed, for grant of payments out of the fund towards the benefits he is entitled to under this Act.

(5) The Board may after receipt of every such application, conduct such enquiry, as it may deem fit, and either grant the application or, for the reasons to be recorded in writing, may reject the same.

Provided that, any such application shall not be rejected unless a reasonable opportunity of being heard is given to the applicants.

(6) The decision of the Board in this regard shall be final.

**15. Scheme.–**

The State Government, may, by notification in the *official gazette,* make one or more schemes for any group of unorganized workers in one or more areas specified in the sub-section (*4*) of section 3 of the Act.

**16. Records.–**

The Board may authorize one or more officers of the Board to maintain statutory records and registers.

**17. Accounts and Audit.–**

(1) The Board shall maintain proper accounts and other relevant records and prepare an annual statement of accounts, including a balance-sheet.

(2) The accounts of the Board shall be audited annually by such qualified person as the State Government may appoint.

(3) The auditor shall at all reasonable times have access to the books of accounts and other documents of the Board, and may for the purposes of the audit, call for such explanation and information as he may require, or examine any member of officer of the Board.

(4) The accounts of the Board certified by the auditor, together with the audited report thereon, shall be forwarded annually to the State Government before such date as the State Government may specify in this behalf.

(5) The Board shall comply with such directions as the State Government may, after perusal of the report of the auditor, think fit to issue.

(6) The cost of audit as determined by the State Government shall be paid out of the funds of the Board Budget.

Scanned by CamScanner

# FORM – I

(*See* **rule 12)**

**(Application for registration of unorganised worker)**

(1) Name of the unorganised worker

(2) Father's/husband's name: ..........................................................................................

(3) Occupation ..........................................................................................................

(4) Address : (a) Present :- ........................................................................................

..........................................................................................................................

(b) Permanent: ........................................................................................................

(5) Mobile No./contact number :-....................................................................................

(6) Whether RSBY Smart Card given:-...............................................................................

(7) Dependents :..........................................................

(a) Father..........................................................

(b) Mother..........................................................

(c) Dependent Children:..........................................

(d) Wife/Husband : ..............................................

(e) Others ..........................................................

(8) The particulars of the documents attached : ..........................................

Place :-

Date :-

Signature/Thumb Impression of the Applicant.

Scanned by CamScanner

Form - II

[*See* **rule 13 (4)**]

**Register of beneficiaries**

1. Full name :
2. Permanent address :
3. Date of birth/age :
4. Sex : Male/Female
5. Registration No. :
6. Name and relation of nominee with address.
7. Whether medical verification is obtained :
8. Particulars of employment.

| Present Address (1) | Nature of work and designation (2) | Name of the present employer/s with address and telephone No. (3) | Date of employment (4) | Signature of Board official. (5) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

Place :

Date :

Signature/Thumb Impression of the Applicant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BALASAHEB KOLASE,

Joint Secretary of Government.

Scanned by CamScanner